सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२** **ई-मेल:** pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१६०२४(११)/४/२०२५-१६/E-२३४५९९३/ कृ. अ. दि. १३/०५/२०२६

**प्रति,**

१. **विभागीय कृषि सहसंचालक,**
**(छत्रपती संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर, नाशिक)**

२. **जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व )**

**विषय : प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेततळ्याच्या शेत परिस्थितीनुसार इनलेट आऊटलेटसह व इनलेट आऊटलेट विरहीत अंतर्गत बदल करणेस मान्यता देणे बाबत.**

**संदर्भ** :- १) प्रकल्पातील वैयक्तिक शेततळे घटकाच्या मार्गदर्शक सुचना NDKSP-२२०१९(२१)/१६/ २०२५-DBT, दिनांक. २८/१०/२०२५

२) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचे पत्र जा.क्र. कृआ/मुदसं/वै. शेततळे/मृद-७/६७६२/२०२३, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३.

३) मा. प्रकल्प संचालक यांची आढावा सभा दिनांक. ६/५/२०२६

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या बाबींमध्ये “वैयक्तिक शेततळे” हा घटक प्रकल्प गावांमध्ये राबविण्यात येत आहे. सदर घटकाच्या अंमलबजावणी संदर्भातील मार्गदर्शक सूचना वरील संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

मा. प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०५.२०२६ रोजी आयोजित आढावा बैठकीमध्ये विभागीय कृषी सहसंचालक यांनी संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या संदर्भ क्र. २ नुसार, शेत परिस्थितीनुसार इनलेट - आऊटलेटसह व इनलेट - आऊटलेट विरहित असा अंतर्गत बदल करणेस मंजूरी देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर प्रकल्पामध्ये देखील सदर बाब लागू करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -:

१. शेत परिस्थितीनुसार इनलेट - आऊटलेटसह व इनलेट - आऊटलेट विरहित असा अंतर्गत बदल करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

२. शेतकऱ्यांनी ज्या अनुदान रकमेच्या शेततळ्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेला आहे, **त्याच रकमेच्या अथवा त्यापेक्षा कमी** अनुदान रकमेच्या शेततळ्यासाठी बदल करण्यात येत असल्यास वाढीव अनुदानाचे कोणतेही अतिरिक्त दायित्व निर्माण होत नसल्याने, अशा प्रकरणी संबंधित शेतकऱ्याचा लेखी संमती घेऊन डेस्क २ वर अपलोड करण्यात यावी व त्यानुसार संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी मान्यता प्रदान करावी.

३. लाभार्थी शेतकऱ्याने शेततळ्यासाठी केलेल्या मूळ ऑनलाईन अर्जामधील **मंजूर अनुदान रकमेपेक्षा जास्त** अनुदान रकमेच्या शेततळ्याची मागणी केल्यास, मंजूर अनुदानापेक्षा अधिक होणारा खर्च लाभार्थी शेतकरी स्वतःच्या खर्चाने करेल, अशी लेखी संमती प्राप्त करून डेस्क २ वर अपलोड

करण्यात यावी व संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी सदर बदलास मान्यता प्रदान करावी. सदर प्रकरणांमध्ये मूळ मंजूर अनुदान रकमेपेक्षा अधिक अनुदानाची अदायगी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

४. पूर्ण झालेल्या शेततळ्याची मोका तपासणी करताना लाभार्थी शेतकऱ्याने दिलेल्या लेखी संमतीनुसार काम पूर्ण झाल्याची खात्री करावी. व त्या प्रमाणे अनुदानाची रक्कम नमूद करून, मूळ मंजूर अनुदान रकमेच्या मर्यादेत अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 13-05-2026
13:20:01

**(मिनल करनवाल)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**प्रत:-** संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीस्तव.